## श्री लक्ष्मेश्वर विद्यालय व आदर्श विद्यालयाच्या वतीने यशवंत, गुणवंत, ज्ञानवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



महेंद्र गोदाम ग्रामीण प्रतिनिधी घाटनांदुर अंबाजोगाई घाटनांदुर येथील श्री लक्ष्मेश्वर विद्यालय व आदर्श विद्यालयाच्या वतीने यशवंत, गुणवंत, ज्ञानवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (NMMS) परीक्षेत तर


रामा नुजन इंटेलिजंट सर्च एक्झाम या परीक्षेत सुद्धा विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे,तसेच माजी विद्यार्थी पोलीस भरती इंडियन आर्मी, नेव्ही ,सरकारी नोकरीला लागणाऱ्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आले , लक्ष्मेश्वर व च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यार्थी व पालकांचे सत्कार करण्यात आले,

या यशाबद्दल शाळेचे ,शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले .पालक वर्गातून शिक्षकांचे कौतुक केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाच्या सुरुवातीस महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले डॉ, नर्सिंग उदार यांनी अतिशय मोलाचे मुलांना मार्गदर्शन केले ते म्हणाले की मोबाईल मुलांनी जास्त हाताळू नये , मैदानी खेळ खेळावेत ,तसेच शिक्षणावर ही भर द्यावा शिक्षण घेणे हे काळाची गरज आहे असे मोलाचे मार्गदर्शन केले .बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आला होता,कार्यक्रमाचे अध्यक्ष शेटे सर हे होते ,प्रमुख उपस्थित पोलीस पाहुणा चे संपादक आत्माराम मिसाळ,मार्गदर्शक श्री नर्सिंग उदार सर , तंटामुक्ती अध्यक्ष मुक्तार शेख सामाजिक कार्यकर्ते कमलाकर मिसाळ,दयानंद लांडगे सुरेश मिसाळ सर , दत्तू गोदाम, प्रमुख उपस्थित तर पत्रकार गोविंद जाधव, पत्रकार अशोक मस्के संजय रानभरे, गणेश जाधव पत्रकार पत्रकार विश्वजीत गंडले, परमेश्वर वैद्य कैलास मिसाळ महिंद्रा गोदाम पत्रकार बांधव व गावातील नागरिकांची मोठी उपस्थिती होती

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गाजलेले भाषण: रानडे, गांधी आणि जिना

— डॉ. भारत कऱ्हाड






भारतीय राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेचा विचार करताना एक मूलभूत प्रश्न सतत समोर उभा राहतो—आपण आधी काय साध्य करायला हवे होते आणि आज काय प्राधान्य द्यायला हवे आहे: सामाजिक सुधारणा की राजकीय स्वातंत्र्य? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या "रानडे, गांधी आणि जिना" या ऐतिहासिक व्याख्यानातून या प्रश्नाला अत्यंत तर्कशुद्ध आणि चिकित्सक पद्धतीने हाताळले. हे व्याख्यान केवळ तीन महान व्यक्तिमत्त्वांची तुलना नसून, भारतीय समाजाच्या दिशेचा आणि नेतृत्वाच्या निकषांचा पुनर्विचार करण्यास भाग पाडणारा एक बौद्धिक दस्तऐवज आहे.

महादेव गोविंद रानडे, महात्मा गांधी, आणि मोहम्मद अली जिना—या तिघांच्या कार्यपद्धती, विचारसरणी आणि नेतृत्वशैली यांचा अभ्यास करताना आंबेडकरांनी एक महत्त्वाची गोष्ट अधोरेखित केली: राष्ट्रनिर्मिती ही केवळ राजकीय घटना नसून ती सामाजिक परिवर्तनावर आधारित असते.

रानडे यांच्या विचारांकडे पाहिले तर ते स्पष्टपणे सामाजिक सुधारणेला प्राधान्य देणारे होते. त्यांच्या मते, समाजातील विषमता, जातिव्यवस्था, स्त्रीदास्य आणि अंधश्रद्धा या समस्या नष्ट केल्याशिवाय कोणतेही स्वातंत्र्य अपूर्ण राहणार आहे. त्यांनी विवेक, तर्क आणि उदारमतवादाच्या आधारावर समाज बदलण्याचा प्रयत्न केला. रानडे यांचे कार्य हे लोकप्रियतेपेक्षा दीर्घकालीन परिणामांवर आधारित होते. ते समाजाच्या मूलभूत रचनेत बदल घडवून आणण्यावर विश्वास ठेवत होते.

याउलट, गांधी आणि जिना यांच्या नेतृत्वाचा विचार केला तर त्यामध्ये सामाजिक सुधारणा दुय्यम ठरल्याचे आंबेडकरांनी स्पष्टपणे नमूद केले. गांधींनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला व्यापक लोकाधार मिळवून दिला, हे निर्विवाद आहे; परंतु त्यांनी जातिव्यवस्थेविषयी घेतलेली भूमिका पुरेशी क्रांतिकारक नव्हती, असे आंबेडकरांचे मत होते. गांधींच्या विचारांमध्ये नैतिकता आणि अध्यात्मिकता यांचा प्रभाव अधिक होता, परंतु सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी आवश्यक असलेली कठोर आणि संरचनात्मक बदलांची भूमिका कमी पडली.

जिना यांच्या बाबतीत आंबेडकरांनी नमूद केले की त्यांचे राजकारण हे प्रामुख्याने मुस्लिम समाजाच्या राजकीय हक्कांवर केंद्रित होते. त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेपेक्षा वेगळेपणावर भर दिला, ज्यामुळे देशाच्या विभाजनाची प्रक्रिया अधिक तीव्र झाली. गांधी आणि जिना यांच्यातील संघर्ष हा केवळ विचारांचा नव्हता, तर नेतृत्वाच्या वर्चस्वाचा संघर्ष होता, ज्याचा परिणाम भारतीय राजकारणाच्या स्थैर्यावर झाला.

या सर्व चर्चेचा केंद्रबिंदू म्हणजे "महान नेता" या संकल्पनेचा पुनर्विचार. आंबेडकरांनी स्पष्टपणे सांगितले की, लोकांच्या भावनांना आवाहन करून लोकप्रियता मिळवणारा नेता महान ठरत नाही. खरा महान नेता तोच, जो समाजातील चुकीच्या रुढी आणि परंपरांना आव्हान देतो, जरी त्यासाठी त्याला लोकांचा विरोध सहन करावा लागला तरी. या निकषावर त्यांनी रानडे यांना उच्च स्थान दिले.

आजच्या काळात या व्याख्यानाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. आपण राजकीयदृष्ट्या स्वतंत्र आहोत, परंतु सामाजिकदृष्ट्या किती मुक्त आहोत, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. जातीय भेदभाव, लिंग असमानता, धार्मिक ध्रुवीकरण यांसारख्या समस्या अजूनही आपल्या समाजात खोलवर रुजलेल्या आहेत. अशा परिस्थितीत आंबेडकरांचा संदेश केवळ ऐतिहासिक न राहता अत्यंत समकालीन ठरतो.

आजचे राजकारण पाहिले तर व्यक्तिपूजक प्रवृत्ती, भावनिक मुद्द्यांवर आधारित निर्णय आणि तात्कालिक फायद्यांसाठी घेतले जाणारे धोरणात्मक निर्णय यांचा प्रभाव वाढताना दिसतो. यामुळे विवेकनिष्ठ आणि तर्काधारित राजकारण मागे पडत आहे. आंबेडकरांनी व्यक्त केलेली उदारमतवादाच्या ऱ्हासाची चिंता आज अधिक स्पष्टपणे जाणवते.

राष्ट्रनिर्मिती ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. ती केवळ संविधान किंवा शासनव्यवस्था निर्माण करून पूर्ण होत नाही. ती समाजाच्या प्रत्येक स्तरावर समानता, न्याय आणि सन्मान प्रस्थापित करण्यावर अवलंबून असते. जर समाजातील मोठा घटक अजूनही वंचित आणि उपेक्षित राहिला, तर लोकशाहीची पायाभरणी कमकुवत होते.

या पार्श्वभूमीवर "रानडे, गांधी आणि जिना" हे व्याख्यान आपल्याला एक महत्त्वाचा धडा देते—राजकीय स्वातंत्र्य मिळवणे हा प्रवासाचा शेवट नसून सुरुवात आहे. खरे उद्दिष्ट म्हणजे सामाजिक समता आणि न्याय प्रस्थापित करणे.

आज भारतासमोर उभ्या असलेल्या आव्हानांचा विचार केला तर शिक्षणातील असमानता, आर्थिक दरी, सामाजिक भेदभाव आणि मूल्यांचा ऱ्हास ही गंभीर समस्या आहेत. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी केवळ धोरणे किंवा कायदे पुरेसे नाहीत, तर समाजाच्या विचारसरणीत बदल आवश्यक आहे.

आंबेडकरांनी दाखवून दिलेला मार्ग म्हणजे विवेक, तर्क, समता आणि सामाजिक न्याय यांचा मार्ग. हा मार्ग स्वीकारण्यासाठी नेतृत्वाने लोकप्रियतेपेक्षा तत्त्वांना प्राधान्य द्यायला हवे. समाजानेही भावनांपेक्षा विचारांना महत्त्व दिले पाहिजे.

शेवटी, "रानडे, गांधी आणि जिना" हे व्याख्यान आपल्याला एक मूलभूत प्रश्न विचारते—आपण कोणत्या प्रकारच्या भारताची निर्मिती करू इच्छितो? केवळ राजकीयदृष्ट्या स्वतंत्र की सामाजिकदृष्ट्या समतावादी आणि न्यायपूर्ण? या प्रश्नाचे उत्तर आपल्या कृतीतून द्यावे लागेल.

जर आपण खऱ्या अर्थाने प्रगत आणि समतावादी भारत घडवू इच्छित असू, तर आंबेडकरांचा विचार केवळ वाचून चालणार नाही, तर तो आचरणात आणावा लागेल. सामाजिक सुधारणा आणि राजकीय स्वातंत्र्य यांचा समतोल साधत, विवेकनिष्ठ आणि न्यायाधिष्ठित समाज निर्माण करणे हीच आजची खरी गरज आहे.

**डॉ भारत कऱ्हाड प्राचार्य वराडकर महाविद्यालय दापोली जिल्हा रत्नागिरी.**

## मोटरसायकलने हूल दिल्याने कार पाचवेळा पलटली; भीषण अपघातात पतीसह गर्भवती पत्नी जखमी..

- गर्भवती पत्नीची प्रकृती चिंताजनक, आष्टी तालुक्यातील बावी येथे भीषण अपघात




कडा :- आष्टी तालुक्यातील बावी येथे आज एक भीषण अपघात घडला असून, पती-पत्नी गंभीर जखमी झाले आहेत.मिळालेल्या माहिती नुसार,पाटोदा तालुक्यातील मारुतीची पांगरी येथे सासर वाडीच्या यात्रेसाठी संतोष गोल्हार हे आपल्या कारने (Mh 12 FF 3795) त्यांच्या पत्नीसह गेले होते.यात्रे वरुन परत येत असताना मोटर सायकलने हूल दिल्यामुळे गाडीचा ताबा सुटल्याने गाडी पाच पलटी होऊन रस्त्याच्या कडेला जाऊन पडली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी हाजीपूर येथील संतोष गोल्हार व त्यांची पत्नी जखमी झाले आहेत. संबंधित महिला गर्भवती असल्याने तिच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

अपघाताची भीषणता इतकी होती की कार रस्त्याच्या कडेला जाऊन पाचवेळा उलटली. या अपघातात संतोष गोल्हार यांच्या पत्नी,ज्या गरोदर आहेत, त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. अपघातानंतर त्यांना तीव्र वेदना होत असल्याने तातडीने आष्टी येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे

अपघाताची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते समीर शेख व ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली.त्यांनी तातडीने जखमींना बावी येथील खाजगी दवाखान्यात प्रथमोपचारासाठी दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना आष्टीला हलवण्यात आले आहे. सुदैवाने या भीषण अपघातात जीवितहानी टळली असली तरी कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे

कापशीजवळ माय-लेकराच्या मृत्यूची घटना ताजी असतानाच आज दुसरा अपघात झाला बीड– कल्याण राज्य महामार्गावर अपघातांची मालिका सुरुच असून, हा मार्ग आता अक्षरशः मृत्यूचा सापळा बनत चालला आहे. कापशी जवळ नुकत्याच घडलेल्या माय-लेकराच्या दुर्दैवी मृत्यूच्या घटनेची वेदना अजूनही ताजी असतानाच आज पुन्हा एक भीषण अपघात घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

परळी संघर्षनेता

प्रतिनिधी नेमणे आहे

बीड,आष्टी,पाटोदा,गेवराई अंबाजोगाई,केज, सिरसाळा,धर्मापुरी

या तालुक्यात व गावात लोकप्रिय परळी संघर्षनेता या वर्तमान पत्रा करिता अनुभवी प्रतिनिधी नेमणे आहे.

-:त्वरित संपर्क करा:-
9881265102

# पिंपळवरील मुंजा..



भूताखेता चे नाव निघाले की त्यांच्यातील भुतावळ प्रसिद्ध असतात,पिशाच्या,समंध,खविस,दैत्य,खाटीक ,नरोबा,आणि झाडावरील मुंजा.

आपल्या सर्वांना हे उगीचच भीतीचे प्रकार वाटू शकतात,पण काही घटना अशा असतात की त्यामळे सत्य परिस्थिती लक्षात आल्या शिवाय राहत नाही, माझ्या लहानपणी असाच एक प्रकार घडला होता,त्याची आठवण आली की अजूनही जीव अगदीं कासावीस होऊन गुदमरुन जातो..

तर त्याचे असं झालं होतं की,आम्हीं पूर्वी जिथं राहत होतोत,ती जागा ऐका गल्लीतील कोपऱ्यात वाडा होता,वाडा मोठा ऐसपैस होता,मुख्य दरवाजा जाण्यासाठी एक लांब बोळ होती,बोळीच्या सुरवातीला घडीव दगडी पाषाणाचा सोपा होता,वाड्यात चार कुटुंब अतिशय गुण्यागोविंदाने राहत असत,त्यामधील आमच्या आत्याचे एक होते,त्यांचा कुटूंबकबिला मोठा असल्याने नेहमीच कोनीनकोण पाहुणे येत असत त्यामुळे घर अगदी गजबजून गेलेलं असे,तर प्रवेशच्या बोळी पलीकडे तत्कालीन मुस्लिम व्यापाराचा पडीक वाडा होता,पुढे मातीच्या पडीक दोन खोल्या, पाठीमागे ओसाड मोकळी जागा आणि त्यापाठी त्यांचा खत साठवणूक उकांडा वजा साठवणूकीची जागा. त्याबाजूला माळी वस्ती तर बाजूला साळी यांचे लहानसहान घरे दारे यामध्ये पडीक जागेत अजस्त्र असा भला मोठा पिंपळ उभा होता.

एकतर त्या जागेची सर्वं लेकरांना भीती होती,आणि त्यामध्ये तो भेसूर पिंपळ म्हणजे एखाद्या भय चित्रपट मधील दृश्य समान दिसत असे,आणि त्यामध्येही त्या पिंपळवरील मुंजा च्या कथा,कहाण्या तर अजूनही भयंकर असत, त्यात आमच्या बाळूभाऊ च्या आजी त्यांना आम्हीं सर्वजण मोठी आई की म्हणत असू,त्यांच्या मताप्रमाणे रात्री आडपरात्री कोणत्याही परिस्थितीत त्या पिंपळाकडे बघू नये कारण फार वर्षा पूर्वी म्हणजेच तो वाडा बांधत असतानाच पलीकडील गल्लीतील ऐका बटूकी करणाऱ्या घरातील लहान मुलाचे कोणत्यातरी कारणामुळे

किंवा आजारपणा मूळे मृत्यू झाला होता, आणि काही दिवसांनी तोच मुंजा होऊन त्या पिंपळावर वस्तीला आला होता.

काय खर आणि काय खोटं, पण झाडावरील मुंजाची साधकबाधक चित्रविचित्र गोष्टींचा भडिमार मात्र निश्चितच होता,आणि तोच जास्त भीतीदायक असे.

त्यामुळेच सर्वांबरोबर आम्हां लेकरांना जास्त त्याची भीती असे,पण सारखं सारख ऐकून त्याची भीती म्हणा किंवा धास्ती थोडीफार कमी झाली होती,आणि पुढे हीच मोठी चूक होती हे लक्षात येणार होते.

आमच्या आत्याचे घर हे टिपिकल वाड्यातील होते,कोपऱ्यात आड, त्यासमोर न्हाणीघर, बाजूला लहान आकाराच्या दगडी पायऱ्या कोपऱ्यात धाबडे कोपऱ्यात वेडावाकड्या चारपाच माळवडावर जायला पायऱ्या,

तर धाबड्या समोर ओसरी,त्याबाजूला दोन तीन फुटाची भिंत वजा आडोसा उभा करुन पलीकडे स्वयंपाक घर,घळीच्या बाजूला थंडगार दोन तीन लादण्या अस अगदी सुबक घर होते.

उन्हाळ्यात दिवस मावळला की मग सायंकाळी कधीमधी आम्हीं सर्वजण माळवदावर जात असू गप्पा मारत कधीमधी मुरमुरे चिवडा खरुड्या किंवा ईतर काहीतरी आत्या खाण्यासाठी देत असत,तर बाहेर गावावरुन पाहुणे आले की मग अजूनही जास्त गप्पा होत,आणि सेलूच्या राणी ताई आल्या की तर हमखास जेवण पण माळवदा होत असे.

आमच्या आण्णा {बाळू चा मोठा भाऊ} एक मोती नावाचे एक कुत्रं पाळले होते,नावाला जरी कुत्र असलं तरी अतिशय हुशार,समजदार असे होते,आणि ते पण आम्हां सर्वांसोबत असे.

ज्या दिवशी घटना घडली तो पण कडक उन्हाळ्यातील एक दिवस होता,कितीही न आठवण्याचा ठरवले तरीही ती घटना विसरु शकत नाही, आठवण आली की मन अगदीं गुदमरुन जाते,जीव नकोसा होतो, दिवसाढवळ्या भीतीने अंग शहारुन जाते,सर्व अंग घामाने चिंब होते..

दिवसभर कडक उन्ह असल्याने सायंकाळी पण गरम झळया लागत असल्याने, त्यामुळे मनाची तगमग अतोनात होत होती,त्यामुळे माझी मोठी बहीण,स्वाती ताई राणी ताई वर माळवदावर बोलत बसल्या होत्या तर मी जालण्याचा पिंटू बाळू एकनाथ बाजूला खेळत गप्पा मारत बसलो होतोत,मग थोडया वेळाने आत्यानीं सर्वांनाच जेवण वर आणले ,गप्पा मारत मनसोक्त जेवण केले,उशीर झाल्यामूळे, मी बाळू पिंटू तिघांनी माळवदावर झोपण्याचे ठरवले,आण्णा,भाऊ दोघे तिघे मोठे असल्याने आम्हां काहीएक वाटत नसे.



त्यादिवशी पण मनात कसलाही विचार नव्हता,सहजसाध्या गप्पा मारत सर्वजण झोपी गेले,पण झोपण्यापूर्वी पाणी पिण्यासाठी मी उठलो तर थोडी हवा सुटली होती,समोर दिसणारा पिंपळाची पाने हव्याने सळसळ करत होती,पण पण वरील फांदीवर मात्र कोणीतरी, काहीतरी असल्या सारखं वाटत होतं,किंवा भास होता हे निश्चितपणे सांगता आलं नसत,पण मी थोडासा घाबरलो,व बाळूला बोलून दाखवले तसे पिंटूने हसण्यावारी नेले,त्यामुळं वातावरण थोडंड्स निवाळलं, आणि मग दिवसभर खेळून थकल्यासारखे झाल्यानें, वारा सुटल्याने कधी एकदा झोप लागली कळलं देखील नाही.

आणि मला अचानकपणे जाग आली, तहान लागली असेल किंवा काहीतरी स्वप्न वैगेरे पडले असेल काही पक्क आठवत नाही,पण जाग मात्र आली,तस थोडा वेळ तसेच पडू[illegible]ईलो,सर्वत्र एकदम निरव शांतता होती,लांबून कुठूनतरी कुत्र्यांचे व्हीवळन्याचा आवाज ऐकू येत असल्याने वातावरण अजूनही भेसूर बनले होते,तसं मी उठलो आणि बाजूला असलेल्या लहान चरवी मधून पाणी घेऊन पिले.आणि झोपण्यापूर्वी सहजपणे समोरील पिंपळाकडे लक्ष दिले तर एकदम अंग शहारुन गेले...

बाहेर वारा सुटला होता, आजूबाजूला असलेली सर्व झाडे,पाने वाऱ्याबरोबर हलत होती,त्यामधील अवाज येत होता,पण पिंपळ मात्र एकदम शांत होते,कसलीही हालचाल नव्हती की पानांची सळसळ नव्हती,आणि वरील दोन फांद्या मध्यें कोणीतरी बसलं होत.

निश्चित काय ते नीट कळत नव्हतं, पण एखादे माकड किंवा जनावर ..नाही ते एक लहान पण प्रौढावस्थेत असलेले मुला सारख होत,आणि अचानकपणे त्याने त्यांची मान हळूहळू एखाद्या यंत्रा सारखी माझ्याकडे वळवायला सुरु केली त्याक्षणी मी पटकन पांघरुणात शिरलो,तस बाळू पण जागा असलेला दिसला त्यानें खुणेनेच शांत राहण्यासाठी बजावलं, तसें काही क्षणात आमचा मोती जो पाय दुमडून अंगाचे वेटूळे करून झोपी गेला होता,त्याचे गुरगुरर्णे ऐकू येऊ लागले,आणि कसला तरी हिंदकळत अघोरी पण कमालीचा शांत हसण्यावारी नकल करत खेक्सन सम आवाज येऊ लागला,तस मी पांघरुण थोडस बाजूला करुन किलकिले डोळ्यातून समोर बघितलं तसं...

माळवदच्या समोरील अबोडधोबीड कच्च्यापक्या मातीच्या भिंतीवर कोणतीतरी आकृती बसली होती, लहानसहान गलेलठ्ठ पोरग उघडंबम्ब अंग, पिंढ्या पर्यत जीर्ण झालेलं धोतर की पांढूरका कपडा की काय,मुंज केलेली असती तसं डोकं,पांढऱ्या गारगुटी सारखे चमकणारे डोळे,हिड्स हास्य करतांना पान खाऊन अनेक दिवसांपासून दात नस्वछ केले तर जसे दिसतात तसे ओंगळवणे दात, चित्रविचित्र पण शांत घातकी नजर,आणि एखादे हिंस्त्र श्वापद जसं भक्षावर झडपा घालण्यासाठी आसुसलेल्या अवस्थेत असत तशा जीवघेण्या अवस्थेत भिंतीवर बसले होते,पुढे काय होत हे कळत नव्हते,पण काही कळायच्या आत मोती एकदम त्या भिंतीकडे चालून गेला तसा,काहीतरी खेकसऱ्या सारखा आवाज आला..

पुढे कितीतरी वेळ मोती पिपंळाकडे बघून भुंकत होता,पण मी पांघरुणाच्या आत जे डोके घातले ते दिवस उजेडी पर्यंत बाहेर काढले नाही.

दुसऱ्या दिवशी मला व बाळूला दोघांनाही सडकून ताप आली,पण आम्हीं दोघांनीही एकवाक्षर देखील कोणालाही बोलला नाही,पण मला जरा जास्तच त्रास होऊ लागल्याने फक्त आम्हीं दोघांनी त्याची आजी मोठी आई यांना सर्वकाही सांगितले तसे,त्यांनी पण एक शब्दही कोणालाही बोलू नका असे बजावले आणि दिवस मावळन्यापूर्वी ,गल्लीतील चार दोन वयस्कर बाया, वाड्यासमोरील मुस्लिम घरातील सर्वात वयस्कर महिला ज्याकी आजीच्या वयाची होत्या,अशा सर्वांनी मिळून कितीतरी वेळ कसली तरी काहीतरी केलं,मग काहीबाई ऐका जुन्या सुपात ठेवलं,आम्हां दोघांना पिंपळाखाली घेऊन गेले त्याखाली असलेल्या देवासमोर पाया पडायला लावले आणि मागे न वळता घरी घेऊन गेले,अंघोळ करून झोपी घातले.

दुसऱ्या दिवशी एकदमच बर वाटायला लागलं, पण त्या दिवशी पासून मी व बाळूने कायमस्वरुपी माळवदावर झोपी जाण्यापासून फारकत घेतली..!

**सचिन स्वामी**
**9623873396**



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

कोणत्या मित्रपक्षाची शिकार करणार हे पाहणे महत्त्वाचे आहे. रोहित पवारांचा दावा खरा ठरल्यास राज्याच्या राजकारणात पुन्हा मोठा भूकंप येऊ शकतो. त्यामुळे राजकारणात नेमकं काय घडणार हे येणारा काळच ठरवणार आहे.

---

वेळेत होणार आहेत. तर 19 एप्रिल रोजीची परीक्षा सकाळी 11:00 ते 2:00 या वेळेत होणार आहे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान व दर्जेदार सरावाची संधी मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

दरम्यान, ही परीक्षा केवळ सराव नसून विद्यार्थ्यांच्या यशाकडे नेणारे पहिले ठोस पाऊल आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वास यांच्या बळावर विद्यार्थी नक्कीच यश संपादन करतील असा विश्वास संस्थेचे संचालक डॉ. रामेश्वर बांगड व प्रा. कैलास घुगे यांनी यावेळी बोलतांना सांगीतले.

तसेच, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी पालक व विद्यार्थ्यांनी अकॅडमीशी संपर्क साधावा.

---

प्रभावित करतील. एक अत्यंत सुंदर, सुरमयी आणि रोमांचक प्रवास आज थांबला आहे. आशाताईंना माझी भावपूर्ण श्रद्धांजली आणि आदरांजली !!

---

रामकृष्ण सटाले यांनी फिर्याद दिली आहे. शनिवारी संध्याकाळी 7.30 च्या सुमारास परळी ते गंगाखेड रोडवरील एकमिना चौक ते उड्डाणपुल दरम्यान हा अपघात घडला.

आरोपी ट्रक चालक दाऊद मोहम्मद शेख (रा. मलीकपुरा, परळी) हा आपल्या ताब्यातील ट्रक (क्र. MH44 U 0619) भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवत होता. या ट्रकने सचिन याच्या दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली. या भीषण अपघातात गंभीर जखमी झाल्यामुळे सचिनचा मृत्यू झाला. या घटनेनंतर पोलिसांनीट्रक चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम 281 आणि 106(1) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक ढोणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिंदे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

---

प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.कडा येथे माध्यमांशी संवाद साधताना सोनवणे म्हणाले, रेल्वे दोन महिन्यांत येणार असल्याचे सांगितले जात आहे, पण कलेक्टरची भूमिका पाहता ते निवडणुकीसाठी तयारी करत आहेत का, असा प्रश्न पडतो.मस्साजोग येथील सरपंच निवडणुकीवरही प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, धनंजय देशमुख परिपक्व आहेत. ते केस मागे घेणार नाहीत. संपूर्ण समाज त्यांच्या पाठीशी उभा आहे. ही निवडणूक बिनविरोध होणारच आहे. धनंजय देशमुख यांच्यावर दबाव टाकला जात असल्याच्या चर्चेबाबत त्यांनी, हा वेगळा विषय आहे, असे म्हटले

---

कल्याण सभापती अंजली माळी आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत शोभायात्रेचा प्रारंभ झाला. याप्रसंगी महात्मा ज्योतिराव फुले यांना अभिवादन केल्यानंतर बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी सांगितले की, महात्मा ज्योतिराव फुले यांनी विषमतेविरुद्ध लढा देऊन बहुजन समाजासाठी शिक्षणाची दारे खुली केली. आजही त्यांचे सत्यशोधक विचार समाजाला दिशा देणारे आहेत. केवळ जयंती साजरी न करता, त्यांनी दिलेला समतेचा आणि स्त्री-शिक्षणाचा वारसा आपण कृतीत आणणे महत्त्वाचे आहे. आधुनिक काळात शिक्षणाचे महत्त्व ओळखून प्रत्येक मुला-मुलीला उच्च शिक्षित करणे हेच आपले ध्येय असले पाहिजे यासाठी आपण कार्यरत राहू असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

परळी वैजनाथ शहरात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त मिरवणुक काढण्यात आली. महात्मा फुले यांचा विजय असो', 'शिक्षण आमच्या हक्काचे' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. पारंपारिक वाद्यांच्या गजरात निघालेली ही मिरवणूक शहरातील मुख्य बाजारपेठ आणि प्रमुख चौकातून मार्गस्थ झाली. या मिरवणुकीत फुले प्रेमी, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

---

अतिवृष्टी सातत्याने सहन करणाऱ्या बीड जिल्ह्यातील मातीला संघर्षाचा मोठा वारसा आहे.क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ.गंगाधरआप्पा बुरांडे, कॉ. बापूसाहेब आण्णा देशमुख, कॉ गुंडा आप्पा जिरगे , कॉ. हमीद हुसेन, कॉ. नानासाहेब पोकळे, कॉ. यशवंत माने, कॉ. निर्मळ, कॉ. सी. एम. शेख, कॉ. नारायण शेप कॉ मा.म.साखरे, कॉ.बाळनाथ शेळके यांसारख्या नेत्यांनी किसान सभेच्या झेंड्याखाली शेतकऱ्यांना संघटित करून अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ दिले.

तोच संघर्षाचा वारसा आजमितीला बीड जिल्हा किसान सभा पुढे नेत असून आजच्या बिकट परिस्थितीत कर्जमाफी, पीक विमा, हमीभाव, ऊस दरवाढ, भूसंपादन प्रक्रिया, शेतकरी विरोधी जागतिक करार या सारख्या शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नावर किसान सभा लढत आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आवाजाला बळ देण्यासाठी अखिल भारतीय किसान सभेचे 24 वे जिल्हा अधिवेशन परळी तालुक्यातील सिरसाळा येथील अर्जुनेश्वर विद्यालय या ठिकाणी बुधवार दि 15 रोजी संपन्न होणार असून या अधिवेशनात शेतीमालाला कायदेशीर हमीभाव मिळावा, पिकविमा कंपन्यांची नफेखोरी रोखून सरसकट पीकविमा नुकसान भरपाई द्यावी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांची कारखानदारांनी घोषित केल्याप्रमाणे गाळप केलेल्या उसाची थकीत देयके तत्काळ व्याजासह देण्यात यावीत, शेतीसाठी शाश्वत वीज पुरवठा आणि सौर ऊर्जा प्रकल्पातील तांत्रिक समस्या दूर कराव्यात, कॉर्पोरेट धार्जिणे सक्तीचे भूसंपादन रद्द करावे, शेतकरी विरोधी अमेरिका भारत करार रद्द करावा. वन्य प्राण्यापासून पिकाचे संरक्षण करणे व सामाजिक सलोखा जोपासणे इत्यादी या विषयावर विचार मंथन होऊन मागण्या पारित करण्यात येणार आहेत.

या अधिवेशनास जिल्हयातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्यने उपस्थित रहावे असे आव्हावन बीड जिल्हा किसान सभा अजय बुरांडे मुरलीधर नागरगोजे बळीराम देशमुख भगवान बडे यांनी केले आहे.

---

असल्याचे प्रतिपादन केले.

परळी वैजनाथ येथील आर्यसमाज मंदिरात जीवनविद्या मिशन, मुंबई शाखा परळी वैजनाथ यांच्या वतीने आयोजित 'विचारांचे सामर्थ्य मोठे' या विषयावरील प्रवचन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. थोर समाज सुधारक सद्गुरु वामनराव पै यांच्या शिष्या आणि 2022 च्या युपीएससी परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम आलेल्या डॉ. कश्मिरा संखे यांच्या मातोश्री डॉ. सौ. प्रतिमा संखे यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संयोजक रमाकांतअप्पा निर्मळे यांनी प्रास्ताविकात या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली. डॉ. प्रतिमा संखे यांनी आपल्या प्रवचनातून 'प्रत्येक कृती राष्ट्रहिताची आणि विश्वशांतीची' असा संदेश देत जीवनविद्या मिशनच्या तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकला.

यावेळी सविस्तर मार्गदर्शन करताना डॉ. सौ. प्रतिमा संखे यांनी सांगितले की,माणसाचे जीवन हे त्याच्या विचारांचे प्रतिबिंब असते. जर आपले विचार शुद्ध, विधायक आणि राष्ट्रहिताचे असतील, तर आपली प्रत्येक कृती आपोआपच समाज कल्याणाकडे वळते. सद्गुरु वामनराव पै यांनी दिलेला 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' हा मंत्र केवळ स्वतःच्या प्रगतीसाठी नसून, तो विश्वशांतीचा मार्ग दाखवणारा आहे. जेव्हा आपण स्वार्थाकडून परार्थाकडे जातो, तेव्हाच खऱ्या अर्थाने विचारांचे सामर्थ्य प्रकट होते. त्यामुळे या विचारांचे अनुकरण सर्वांनी करावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले की, सद्गुरु वामनराव पै यांचे विचार हे जीवनाला देशा देणारे विचार आहेत. जीवनविद्या मिशनच्या माध्यमातून परळी शहरात अशा प्रकारच्या प्रबोधनात्मक मार्गदर्शनाने निश्चितच जीवनाची एक दिशा आणि मार्ग सापडणार आहे.आजचा हा कार्यक्रम हा खऱ्या अर्थाने वैचारिक मेजवानीच ठरला असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला परळी शहरातील नागरिक, महिला आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमाकांतअप्पा निर्मळे, त्यांचे मित्र मंडळ व जीवन विद्या मिशन शाखा परळी वैजनाथ यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

## पान 4 वरुन

सर्व प्रकल्पांमधील अवैध पाणी उपसा तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

बीड जिल्ह्यात वाढत्या उन्हामुळे जलस्रोत वेगाने आटत असून जनावरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनण्याची चिन्हे आहेत. अवैध पाणी उपसा रोखून उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे ही काळाची गरज आहे असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले.

तसेच तालुकास्तरावर याबाबत कठोर उपाययोजना राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. पाणीटंचाईच्या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी प्रशासन सतर्क झाले असून नागरिकांनीही पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. एप्रिलच्या सुरुवातीलाच निर्माण झालेली ही परिस्थिती अधिक तीव्र होण्याची चिन्हे असून, पाणी व्यवस्थापनाचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

---

आहे. बीड शहर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

---

लुंबिनी बुद्ध विहार येथे या कार्यक्रमाचे उद्घाटन दिव्यांग विभागाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिक अजयकुमार गंडले होते .तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध साहित्यिक व पत्रकार रानबा गायकवाड, नगरसेवक निळकंठ चाटे, नगरसेवक पिंटुभैय्या मुरकुटे, नगरसेवक भीमराव डावरे, पृथ्वी शिंदे, दिनेश गजमल आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.संतोष मुंडे म्हणाले की, एप्रिल महिन्यात तीन दिवसांत दोन महापुरुषांचा जन्म झाला आहे.त्यामुळे महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर झाला पाहिजे. तर अध्यक्षीय भाषणात अजयकुमार गंडले यांनी महात्मा फुले यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकताना महात्मा फुले हे त्याकाळी प्रचंड श्रीमंत होते तरी त्यांनी बहुजनांच्या उद्धारासाठी स्वतःला वाहून घेतले. महात्मा फुले यांनीच रयतेचे राजे कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिवनावर एक हजार ओळींचा प्रथम पोवाडा लिहिला.तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श आजच्या तरुणांनी घ्यावा असे आवाहन केले.यावेळी निळकंठ चाटे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी समाज प्रबोधनकार पवन महाराज दवंडे यांनी खास शैलीत आजच्या भोंदुगिरीवर व देशातील विदारक परिस्थितीवर हल्ला चढवला.तसेच मनोरंजनातून प्रबोधन करतांना उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महात्मा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक संयुक्त जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष दिनेश गजमल उपाध्यक्ष सचिन कांबळे सचिव हरीश चव्हाण कोषाध्यक्ष मेघराज पारधे, कोषाध्यक्ष गणेश मोदानी आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन कवी सिद्धेश्वर इंगोले यांनी केले. कार्यक्रमास शिवाजीनगर तसेच परिसरातील महिला, पुरुष, बालक, बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

---

शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस पुढील तपास करत आहेत. दरम्यान, गेल्या आठवड्यात अशा प्रकारच्या तिसऱ्या-चौथ्या घटना समोर आल्याने पालकवर्गात मोठी चिंता निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांवर वाढता शैक्षणिक ताण, स्पर्धा आणि अपेक्षांचे ओझे यामुळे मानसिक तणाव वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. एकूणच, वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पालकांनी मुलांशी संवाद वाढवून त्यांना मानसिक आधार देणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचा तणाव हा केवळ शिक्षणापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो भावनिक आणि मानसिक पातळीवरही परिणाम करत आहे. आई-वडिलांच्या मुलांकडून अपेक्षा अनेकदा अतिरेक ठरत आहेत. त्यातच कुटुंबातील संवाद मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. गप्पा मारणे, अडचणी शेअर करणे हे धावपळीच्या आयुष्यात हरवत चालले आहे. त्यामुळे मुलं एकटी पडत असून अशा घटना घडताना दिसत आहेत, असे मत मानसोपचार तज्ज्ञ डॉ. रेखा ढेरे घोलप यांनी व्यक्त केले

---

वसंतराव गायकवाड, उपाध्यक्ष अमोल अर्जुन मस्के, सचिव सुमेर सूर्यकांत समींदरसवळे, कोषाध्यक्ष संध्या भैय्यासाहेब जगतकर तसेच लता पंडित इंगळे, सुनील माणिकराव जगतकर, कैलास हरिभाऊ उपाडे, भैय्यासाहेब शिवाजीराव जगतकर, अतुल अनिल चौरे, सुभाष आदी सदस्यांनी पुढाकार घेतला होता.

संघटना स्थापन झाल्यानंतर पहिल्याच मोठ्या मागणीला यश मिळाल्याने पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, त्यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी, उपमुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांचे आभार मानले आहेत. तसेच पुढील काळातही कामगारांच्या हक्कासाठी लढा सुरु ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

---

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी संबंधित अधिकारी व संघटना पदाधिकारी व कामगार प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक दोन वेळा घेऊन जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांना निर्देश दिले तरीसुद्धा आजतागायत त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही.

आर्थिक विषमतेची साखळी तोडून मुख्य प्रवाहात येऊ शकेल याकरिता संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येत आहे. तीन दिवस संपून चौथा दिवस सुरु झाला आहे तरी देखील अद्याप न्याय मिळाला नाही.

तात्काळ न्याय द्यावा अन्यथा

दिनांक 15 एप्रिल 2026 रोजी संतप्त कामगार टोकाची भूमिका घेतील असा इशारा एका प्रसिद्ध केलेल्या पत्रकात शहराध्यक्ष मनोहर मुंडे यांनी दिला आहे.

---

ठरवले. त्याने आपल्या साडेतीन वर्षांच्या मुलाला मोबाईल देऊन गुंतवून ठेवले आणि अल्पवयीन मुलीशी लज्जास्पद चाळे करण्यास सुरुवात केली. मुलीने त्याला विरोध करत आईला सांगण्याची धमकी दिली. मात्र, आईला सांगायचे नसते, आपल्यात भांडणे होतील, असे म्हणत त्याने मुलीवर बळजबरीने अत्याचार केला. आई घरी आल्यानंतर मुलगी रडत असल्याचे तिच्या निदर्शनास आले. आईने विचारले असता सुरुवातीला मुलगी प्रचंड घाबरलेली असल्याने काहीच बोलली नाही, मात्र आईने विश्वासात घेऊन विचारल्यानंतर तिने घडलेला सर्व प्रकार सांगितला.

त्यानंतर पीडितेच्या आईने केज पोलिस ठाण्यात धाव घेत नराधम पित्याविरोधात तक्रार दाखल केली. दिलेल्या तक्रारीवरुन नराधमावर गु. र. नं. 198/2026 नुसार भारतीय न्याय संहिता 64(3)(एफ), 65(1) आणि पोक्सो कलम 4 व 6 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास पिंक पथकाचे फौजदार प्रकाश शेळके करत आहेत.

---

त्यांना अभिवादन करण्यात आले व उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. प्रमुख पाहुणे श्री महादेव तुरे सर यांनी जोतिबा फुले यांच्या शैक्षणिक कार्याविषयी व समाज कल्याण ऑफिस कडून दिल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्ती व विद्यार्थ्यांसाठी विविध योजना तसेच बार्टी पुणे यांच्याकडून विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली .

अध्यक्षीय समारोप प्रसंगी माननीय श्री सावंत सरांनीही ज्योतिबा फुले यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती व विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती सांगितली श्री महादेव तुरे सर यांनी शाळेत उद्देशिका भेट दिली या या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सावंत मॅडम यांनी केले व आभार कोळपे सरांनी व्यक्त केले

---

अकरा वर्षांच्या मुक्ता साळवे या विद्यार्थिनीने 'आम्ही धर्म नसलेली माणसे' हा निबंध लिहिला होता. त्याकाळी हा निबंध जागतिक पातळीवर चर्चेचा विषय ठरला आणि इंग्लंडच्या राणीने प्रतिनिधी पाठवून तिचा सत्कार केला. नऊ-दहा वर्षांची मुले इतक्या चिकित्सकपणे विचार करत होती, याचाच अर्थ महात्मा जोतिराव फुले यांच्या शाळेतील शिक्षणाचा दर्जा जागतिक पातळीचा होता. आज पुन्हा तशाच दर्जेदार शिक्षणाची गरज आहे.

म.जोतिराव फुले यांनी महिलांच्या शिक्षणातूनच समाजाची प्रगती साधली, याकडे लक्ष वेधत सोळुंके म्हणाले की, "आज विविध माध्यमांतून महिलांची शक्ती कमी करण्याचे प्रयत्न होत आहेत. कधी 'लाडकी बहीण' सारख्या योजनांच्या माध्यमातून, तर कधी बुवा-बापूंच्या नादी लागून किंवा टीव्हीवरील मालिकांच्या प्रभावाखाली महिलांना परिवर्तनाच्या मार्गापासून दूर नेले जात आहे. अशा वेळी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा प्रसार करणे ही काळाची मोठी गरज आहे.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात माहिती देण्यात आली की, 14 एप्रिल 2026 रोजी सकाळी मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते पंचशील ध्वजरोहन होईल. त्यानंतर सकाळी 11 वाजता प्रसिद्ध व्याख्याते नितीन सावंत (परभणी) यांचे 'महापुरुषांचे विचार व सद्यस्थिती' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपकार्यकारी अभियंता शिवाजी होटकर यांनी केले, सूत्रसंचालन प्रदीप चव्हाण यांनी केले, तर आभार बी. एल. वडमारे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सार्वजनिक उत्सव समितीचे पदाधिकारी महेंद्र रोडे, संघरक्षित मस्के, संघपाल कांबळे, लक्ष्मण शिंदे, आदींनी विशेष परिश्रम घेतले. व

---

तात्काळ गटविकास अधिकारी यांना पत्र लिहून या संदर्भात कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तहसीलदार यांचे पत्र क्रमांक 2026/ जमा-2/कावी-दि. 10-03-2026 रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन त्याची प्रत तहसीलदार गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत कार्यालयात दिली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी जाय मोक्यावर जाऊन तेथील स्थळ पाणी करुन योग्य ती कारवाई करावी असं तहसीलदार यांचे पत्र गट विकास अधिकारी यांच्याकडे पाठवले आहे. या संदर्भात काय कारवाई होते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

---

ओळखणारे पहिले विचारवंत म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले होत. त्यांनी स्त्री शिक्षणाला चालना देत समाजपरिवर्तनाचा पाया घातला.

यावेळी त्यांनी सावित्रीबाई फुले यांचे कार्यही विशेषत्वाने सांगितले. महात्मा फुले यांनी आपल्या पत्नीला शिक्षण देऊन पुढे पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी शाळा सुरू केली, ही शिक्षण क्षेत्रातील क्रांतिकारी पाऊल होते.

पुढे छत्रपती शाहू महाराज यांनी शिक्षण सक्तीचे करून समाजातील सर्व घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली केली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समान शिक्षणाची संकल्पना पुढे नेली, त्याचबरोबर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी आंबेडकरी चळवळ यशस्वीरित्य पुढे चालवली असेही त्या म्हणाल्या.

आज स्त्री-पुरुष शिक्षणाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रगती करत असून, या सर्व परिवर्तनामागे या महान विचारवंतांचे योगदान आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी महापुरुषांचे विचार आत्मसात करून समाज व देशाच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी राम माळी हिचा वाढदिवस साजरा करून तिला शुभेच्छा देण्यात आल्या. शेवटी खळगे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता अल्पोपहाराने करण्यात आली.

या कार्यक्रमाला शालेय विद्यार्थी तसेच परिसरातील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

खचून जातात, पण दर्शनने धीर सोडला नाही. वडिलांचं "मुलगा पोलीस व्हावा" हे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार त्याने केला आणि त्यासाठी तो सातत्याने प्रयत्न करत राहिला.

पोलीस भरतीची तयारी करताना त्याने स्वतःला शिस्त लावली. पहाटे उठून धावणे, मैदानी सराव, शारीरिक चाचण्यांची तयारी आणि त्यानंतर अभ्यास असा त्याचा रोजचा दिनक्रम होता. कोणत्याही मोठ्या कोचिंगशिवाय त्याने स्वतःच्या मेहनतीवर विश्वास ठेवला. साध्या परिस्थितीत राहूनही त्याने आपलं ध्येय डोळ्यासमोर ठेवलं आणि प्रयत्न सुरु ठेवले.

नुकत्याच झालेल्या पोलीस भरतीत दर्शनने ओबीसी प्रवर्गातून 132 गुण मिळवत गुणवत्ता यादीत स्थान मिळवलं. धावणे, शारीरिक चाचण्या आणि लेखी परीक्षेत त्याने चांगली कामगिरी केली. त्यामुळे त्याची पालघर पोलीस दलात निवड झाली. त्याच्या मेहनतीचं हे फळ असल्याची भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

दर्शनच्या यशामुळे निले कुटुंबासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे. वडिलांच्या निधनानंतर आई आणि मावशीने दिलेलं पाठबळ, कुटुंबीयांचं सहकार्य आणि स्वतःची जिद्द यामुळे तो इथपर्यंत पोहोचला. त्याच्या यशामुळे घाटनांदूर गावात आनंदाचं वातावरण आहे. गावकऱ्यांकडून त्याचं अभिनंदन होत असून अनेकांनी त्याचा सत्कारही केला आहे.

दर्शनचा हा प्रवास ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. "परिस्थिती कठीण होती, पण वडिलांचं स्वप्न पूर्ण करायचं होतं. आई आणि मावशीच्या पाठबळामुळे आणि मेहनतीमुळे हे शक्य झालं. जिद्द ठेवली तर यश नक्की मिळतं," असं दर्शन शंकर निले याने सांगितलं.

---

# ममतांचा ढासळता किल्ला

पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या मजबूत किल्ल्याला आता तडा जात असल्याचे चित्र दिसत आहे. भाजपचा वाढता प्रभाव, मतदार यादीतील बदल आणि बदलती सामाजिक समीकरणे निवडणुकीला नवे वळण देत आहेत. बंगालमधील लढत केवळ सत्तेसाठी नाही, तर अस्मिता आणि राजकीय भविष्यासाठीची आहे. पश्चिम बंगालचे राजकारण पुन्हा तापले आहे. सत्ताकारणातील हालचाल वाढली असून, पाच राज्यांच्या निवडणुकांमध्ये सर्वाधिक लक्ष पश्चिम बंगालकडे लागले आहे. येथे लढाई केवळ जागांची नसून सत्ता, अस्मिता आणि भविष्यातील राजकीय अस्तित्वाची बनली आहे. एका बाजूला ममता बॅनर्जी यांचा मजबूत वाटणारा किल्ला आहे, तर दुसऱ्या बाजूला भाजपचा झपाट्याने वाढणारा प्रभाव. यामध्ये काँग्रेस कमकुवत असली, तरी 'गेमचेंजर' ठरू शकते.

पश्चिम बंगाल दीर्घकाळ डाव्या पक्षांचा बालेकिल्ला होता. 1977 ते 2011 या काळात डाव्या आघाडीने सलग सत्ता राखली. त्यानंतर ममता बॅनर्जी यांनी 'माँ, माटी, मानुष' या घोषणेवरून सत्ता मिळवली; मात्र 15 वर्षांनंतर आता त्यांच्या सत्तेविरोधात नाराजी वाढताना दिसते. भाजपाचा उदय हा या बदलाचा मुख्य घटक आहे. 2016 मध्ये केवळ 10 टक्के मतांवर असलेला भाजप 2021 मध्ये 38 टक्क्यांपर्यंत पोहोचला. दुसरीकडे तृणमूल काँग्रेसनेही आपला मतशेअर वाढवला; पण काँग्रेस आणि डाव्या पक्षांचा मोठा ऱ्हास झाला. याच रिकाम्या जागेत भाजपने आपली ताकद निर्माण केली. या निवडणुकीत सर्वात चर्चेचा विषय ठरली आहे, मतदार यादीचे विशेष पुनरावलोकन (एसआयआर) मोहीम. सुमारे 90 लाखांहून अधिक मतदारांची नावे वगळली गेल्याची चर्चा आहे, जी एकूण मतदारांच्या जवळपास 12 टक्के आहे. याचा थेट परिणाम निवडणूक निकालांवर होणार आहे. विशेषतः शहरी भागात, जिथे पूर्वी तृणमूलचा मजबूत प्रभाव होता, तिथे मतदारांची भूमिका बदलताना दिसते. 'भद्रलोक' वर्गातील मतदारांमध्ये भाजपविषयीचा संकोच कमी होत असल्याचे संकेत मिळत आहेत.

बंगालमधील धार्मिक आणि सामाजिक रचना निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावते. हिंदू बहुल आणि मुस्लीमबहुल मतदारसंघांमध्ये वेगवेगळे मतदान पॅटर्न दिसतात. तृणमूलचा मुस्लीम मतदारांवर मजबूत प्रभाव आहे, तर भाजपचा आधार काही विशिष्ट हिंदू समुदायांमध्ये आहे; मात्र एसआयआर प्रक्रियेमुळे दोन्ही पक्षांच्या मतदारांवर परिणाम होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे समीकरणे अधिक गुंतागुंतीची झाली आहेत.या निवडणुकीला आता अस्मितेचा रंग चढला आहे. ममता बॅनर्जी या मुद्द्याला बंगालच्या ओळखीशी जोडत आहेत, तर भाजप याला पारदर्शकता आणि शुद्धीकरणाचा भाग मानत आहे. बेरोजगारी, उद्योगांची कमतरता, भ-ष्टाचार आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न मागे पडताना दिसतात. त्यामुळे मतदार कोणत्या मुद्द्यावर मतदान करतो, यावर निकाल अवलंबून असेल. तृणमूल सरकारच्या 'लक्ष्मी भंडार' आणि 'कन्याश्री'सारख्या योजनांमुळे महिला मतदारांमध्ये ममतांचा मोठा प्रभाव आहे. या योजनांमुळे महिलांना थेट आर्थिक मदत मिळते. याला उत्तर म्हणून भाजप महिला आरक्षणासारख्या मुद्द्यांवर भर देण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे महिला मतदारांचा कल निर्णायक ठरू शकतो.

भाजप शहरी भागात आपली पकड मजबूत करत आहे आणि नवीन सामाजिक गटांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे. तृणमूल मात्र ग्रामीण भागातील आपला पारंपरिक आधार मजबूत ठेवण्यावर भर देत आहे; मात्र शहरी असंतोष वाढत असल्याने तृणमूलसाठी ही चिंतेची बाब आहे. काँग्रेसची स्थिती कमकुवत असली, तरी ती पूर्णपणे अप्रासंगिक नाही. अनेक ठिकाणी ती 'कटिंग फॅक्टर' ठरू शकते. काही मतदारसंघांमध्ये त्रिकोणी लढतीमुळे निकालावर परिणाम होऊ शकतो. भाजप आणि तृणमूल दोघांनाही काँग्रेसच्या भूमिकेचा फायदा किंवा तोटा होऊ शकतो.






हॅलो बीड
परळी
# संघर्षनेता
सोमवार दि. 13 एप्रिल 2026


## उन्हाची तीव्रता वाढली; एप्रिलच्या सुरुवातीलाच प्रकल्प कोरडे

# जनावरांच्या पाणीटंचाईचा प्रश्न ऐरणीवर; जिल्ह्यातील पाणी परिस्थिती चिंताजनक



बीड, पुढारी वृत्तसेवा: एप्रिल महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्याने बीड जिल्ह्यातील पाणी परिस्थिती चिंताजनक बनू लागली आहे. वाढत्या तापमानाचा फटका थेट जलसाठ्यांना बसत असून अनेक लघु प्रकल्प व पाझर तलाव कोरडे पडल्याचे वास्तव समोर येत आहे.परळी तालुक्यातील कातकरवाडी येथील लघु प्रकल्प तसेच डाबी येथील पाझर तलाव पूर्णपणे कोरडे पडले आहेत. तर खोडवा सावरगाव येथील पाझर तलावानेही तळ गाठल्याचे दिसून येत आहे. या जलस्त्रोतांवर शेतीसह जनावरांच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात गरज भागवली जात होती. मात्र सध्या हे स्त्रोत आटल्याने परिसरातील शेतकरी आणि पशुपालक मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

पावसाळा येईपर्यंत पर्यायी व्यवस्था न केल्यास जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरुप धारण करण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आधीच चाऱ्याची टंचाई भासत असताना पाण्याचा प्रश्न अधिकच बिकट होण्याची शक्यता आहे. दरम्यान, गतवर्षी चांगल्या पावसामुळे बीड जिल्ह्यातील तब्बल 173 पाणी प्रकल्प ओव्हरफ्लो झाले होते.

मात्र यावर्षी वाढती उष्णता आणि अवैध पाणी उपशामुळे या प्रकल्पांतील पाणीसाठ्यात झपाट्यानेघट होत आहे. अनेक ठिकाणी पाणीपातळी धोकादायकरीत्या खाली गेल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील पान 3 वर

# बीडमध्ये भाजप नगरसेविकेच्या पतीला भररस्त्यात मारहाण

## जाधव पिता- पुत्रासह पाच जणांच्या विरोधात गुन्हा दाखल



बीड: बीडमध्ये निवडणुकीच्या वादातून भाजपा नगरसेविकेचे पती सागर देशपांडे यांना शुक्रवारी मध्यरात्री भररस्त्यात मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, या प्रकरणी बीड शहर पोलिस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपा उमेदवार भाग्यश्री देशपांडे निवडून आल्या आहेत. त्यांचे पती सागर देशपांडे हे रस्त्यावर फोनवर बोलत असताना, त्या ठिकाणी आलेल्या बाळू जाधव व यशराज जाधव यांच्यासह इतर तीन जणांनी त्यांना लाथा-बुक्क्यांनी जबर मारहाण केली.

या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून, व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई केली आहे. या प्रकरणात मारहाण करणाऱ्या बाळू जगन्नाथ जाधव व यशराज बाळू जाधव यांच्यासह इतर तीन जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला पान 3 वर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त वडवणी येथे भीमज्योत रॅली व स्नेहभोजनाचे आयोजन

वडवणी | प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार, राष्ट्रनिर्माते, विश्वरत्न बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त वडवणी शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.




सोमवार दि. 13 एप्रिल 2026 रोजी रात्री 11:30 वाजता भव्य भीमज्योत रॅली काढण्यात येणार आहे. तसेच मंगळवार दि. 14 एप्रिल रोजी सकाळी 09 वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथून मोटारसायकल रॅलीची सुरुवात होऊन ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समाप्त होईल.

यानंतर सकाळी 10 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात येणार आहे. पुढे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने सकाळी 11 ते सायं. 06 या वेळेत स्नेहभोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा शहर व तालुक्यातील सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच रविवार दि. 26 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी 06 ते रात्री 10 या वेळेत सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे व विशाल चव्हाण यांचा भीमगीतांचा जंगी मुकाबला रंगणार आहे. पान 3 वर

## समाज प्रबोधनकार पवन महाराज दवंडे यांच्या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

### महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती सोहळयास परळीत सुरुवात





परळी प्रतिनिधी. प्रसिद्ध खंजिरी वादक व प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे शिष्य पवन महाराज दवंडे यांच्या शिव, फुले ,शाहू, आंबेडकर समाज प्रबोधन कार्यक्रमास उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. परळी शहरातील शिवाजीनगर येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीच्या निमित्ताने संयुक्त जयंती सोहळ्यास काल दिनांक 11 एप्रिल पासून सुरुवात झाली.

क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची 199 जयंती 11 एप्रिल रोजी तर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती 14 एप्रिल रोजी उत्साहात साजरी करण्यात येत आहे .या निमित्ताने शिवाजीनगर परळी येथे संयुक्त जयंती महोत्सव सोहळ्यास सुरुवात झाली. रात्री 8 वाजता पान 3 वर

## अभ्यासाच्या तणावातून विद्यार्थिनीने जीवन संपवले

### अंबाजोगाईतील धक्कादायक घटना; पालकांमध्ये चिंता वाढली



अंबाजोगाई, अंबाजोगाई शहरातील सावता माळी चौक परिसरात राहणाऱ्या एका बारावीच्या विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना शुक्रवारी (दि. 10) रात्री घडली असून शनिवारी सकाळी उघडकीस आली.पूनम मेघराज दहिफळे (वय 17) असे मृत विद्यार्थिनीचे नाव असून ती मूळ उमरेवाडी (ता. धारुर) येथील रहिवासी होती. शिक्षणासाठी ती अंबाजोगाई येथे भाड्याच्या खोलीत राहत होती. प्राथमिक माहितीनुसार, अभ्यासाच्या तणावातून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याची पान 3 वर

## परळीतील कंत्राटी कामगारांना दिलासा; राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ च्या पाठपुराव्याला यश



परळी वैजनाथ / प्रतिनिधी राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ (RMBKS) च्या परळी वैजनाथ शाखेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून नगरपरिषदेकडील कंत्राटी कामगारांचे थकीत वेतन देण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. नगरपालिकेचे नगाराध्यक्ष मुख्याधिकारी, उपमुख्याधिकारी यांनी सकारात्मक भूमिका घेत कामगारांचे थकीत वेतन अदा केले.

कंत्राटी कामगारांना दीर्घकाळापासून वेतन न मिळाल्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. याबाबत RMBKSच्या पदाधिकाऱ्यांनी एकजूट दाखवत प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळाल्याने कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या मागणीसाठी संघटनेचे अध्यक्ष विक्रांत सूर्यकांत समींदरसवळे, कार्यकारी अध्यक्ष बालाजी मारोती गजबे, महासचिव अविनाश पान 3 वर

## सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध शासकीय परिपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी करा- मनोहर मुंडे

( प्रतिनिधी ) स्वच्छतेमुळे शहराची समृद्धीकडे वाटचाल सुरु झालेली आहे. स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतर ही स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या जीवनात अपेक्षित बदल झालेला दिसत नाही. कोरोनासारख्या कठीण काळात जेव्हा सर्वजण घरात होते, तेव्हा पोलीस आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरुन आपले कर्तव्य बजावले. त्यामुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांनी केलेल्या सेवेचा सन्मान राखला गेला पाहिजे. सफाई कर्मचाऱ्यांना देय असलेल्या विविध शासकीय परिपत्रकाची त्वरित आणि प्रभावी अंमलबजावणी करावी असे





आवाहन एका प्रसिद्ध केलेल्या पत्रकात रोजंदारी मजदूर सेनेचे शहर अध्यक्ष मनोहर मुंडे यांनी केले आहे.

शुक्रवार दिनांक 10 एप्रिल 2026 रोजी नगरपरिषद परळी वैजनाथ व माजलगाव नगरपरिषद कार्यालय समोर संतप्त कंत्राटी सफाई कामगारांनी अन्नत्याग उपोषण सुरु केले आहे. आंदोलनाच्या चौथ्या दिवशी सुद्धा जिल्हा प्रशासन, तालुका प्रशासन व स्थानिक नगर परिषद प्रशासन यांनी दखल घेतली नाही. संघटनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वाखाली मागील अनेक वर्षापासून लोकशाही मार्गाने आंदोलन करुन शासनास व प्रशासनास जागे करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. आंदोलनाच्या अनुषंगाने पान 3 वर

## केज हादरले! सावत्र बापाचा 13 वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार

### नात्याला काळीमा फासणारी घटना; नराधमावर 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल



केज : केजमध्ये नात्याला काळिमा फासणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अवघ्या 13 वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर तिच्याच सावत्र बापाने लैंगिक अत्याचार केला असून, या नराधमावर केज पोलीस ठाण्यात 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलीच्या आईने पतीसोबत मतभेद झाल्याने नऊ वर्षांपूर्वी घटस्फोट घेतला होता. त्यानंतर तिने आरोपीसोबत दुसरे लग्न केले. या दुसऱ्या लग्नापासून त्यांना एक मुलगाही आहे. 9 एप्रिल रोजी पीडित मुलीची आई माहेरी गेली होती. दुपारी साडेबाराच्या सुमारास सावत्र पिता घरी आला आणि मुलगी घरी एकटीच असल्याचे पाहून त्याने गैरफायदा घेण्याचे पान 3 वर

## अशोक माध्यमिक विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती



वडवणी : शनिवार दि.11 रोजी चिंचाळा येथील अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सावंत होते तर प्रमुख पाहुणे महादेव महादेव तुरे होते अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते ज्योतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पान 3 वर

## महात्मा फुलेंच्या संकल्पनेनुसार आजच्या पिढीला दर्जेदार, चिकित्सक आणि जागतिक पातळीचे शिक्षण मिळावे - व्याख्याते अभिषेक सोळुंके

### या देशात म.फुलेंनी खऱ्या अर्थाने समता स्थापित केली - उपमुख्य अभियंता हिम्मत अवचार



गरज आहे," असे प्रतिपादन बीड येथील सामाजिक कार्यकर्ते तथा व्याख्याते अभिषेक सोळुंके यांनी केले.

दिनांक 11 एप्रिल रोजी आयोजित या कार्यक्रमाच्या अर्चना रोडे, जयश्री वडमारे, उपकार्यकारी अभियंता श्रीकांत इंगळे आणि डी. एस. डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे अध्यक्ष उपमुख्य अभियंता हिम्मत अवचार साहेब म्हणाले की, महात्मा जोतिराव फुले यांनी या देशात खऱ्या अर्थाने समता स्थापित केली. स्त्री-पुरुष असो किंवा विविध जाती-धर्माचे लोक, शिक्षणाच्या आधारे सर्वांना समान हक्क मिळवून देण्याचे मोठे कार्य त्यांनी केले.

आपल्या मार्गदर्शनात व्याख्याते अभिषेक सोळुंके म्हणाले, "महात्मा जोतिराव फुले यांनी 1848 मध्ये मुलींची पहिली शाळा सुरु केली. त्या शाळेत शिकणाऱ्या अवघ्या दहा- पान 3 वर

## चिंचवण मध्ये हेमाडपंती मंदिराच्या बाजूचा बारव बुजून घर बांधकाम केल्याचा प्रकार उघडकीस

वडवणी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचवन येथे पुराण काळातील हेमाडपंथी मंदिर असून त्याच्या बाजूलाच पुराण काळातील बारव असून तेथील अतिक्रमित धारकांनी त्याच्यावर घर बांधकाम केल्याचे उघडकीस आल्याने तेथील लक्ष्मण ज्ञानोबा कोठुळे यांनी ग्रामपंचायत कार्यालय चिंचवण, तहसीलदार वडवणी व जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन देऊन हिंदू धर्मियांच्या



भावना दुखावित असल्याचा आरोप करत जिल्हाधिकाऱ्याकडे कारवाईची मागणी केली.

सविस्तर वृत्त असे की वडवणी तालुक्यातील चिंचवण येथे पुराण काळातील हेमाडपंथी मंदिर आहे त्याच मंदिराच्या शेजारी पुराण काळातील कुंड ( बारव ) असून तो बुजवण्यात आलेला आहे आणि त्यावर घर बांधकाम सुरु असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून यामुळे गावात तणावाचे वातावरण आहे. या संदर्भात तहसीलदार यांनी पान 3 वर

## स्त्री शिक्षणाचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले यांचा आदर्श सर्वांनी घ्यावा - सौ.शीला सुखदेव उजगरे

वडवणी प्रतिनिधी


वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथे छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन वाचनालयाचे सचिव प्रकाश तुळशीराम खळगे सर तसेच



ग्रंथपाल सौ. शीलाताई सुखदेव उजगरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शाळेतील अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्यावर आपले विचार मांडले. त्यानंतर ग्रंथपाल सौ. शीलाताई उजगरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या की, सर्वांसाठी शिक्षणाची गरज पान 3 वर

## पितृछत्र हरपले तरी जिद्दीने गाठले यशाचे शिखर; घाटनांदूरचा दर्शन निले पालघर पोलीस दलात



घाटनांदूर | प्रतिनिधी : जीवनात कितीही संकटं आली तरी जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यावर मात करता येते, याचं उदाहरण घाटनांदूर (ता. अंबाजोगाई) येथील चि. दर्शन शंकर निले याने दाखवून दिलं आहे. वडिलांचं अकाली निधन, घरची हलाखीची परिस्थिती आणि वाढलेल्या जबाबदाऱ्या अशा अडचणींमध्येही त्याने पालघर पोलीस भरतीत 132 गुण मिळवत यश मिळवलं आहे.

दर्शनचे वडील स्व. शंकर निले हे कपड्याचे छोटे व्यापारी व आईचा शिवणकाम चा व्यवसाय होता. कै.शंकर आप्पा नीले यांच्या व्यवसायावरच कुटुंब चालत होतं. मात्र, त्यांच्या अचानक निधनामुळे कुटुंबावर मोठं संकट आलं.

आर्थिक अडचणी निर्माण झाल्या, घराचा आधारच हरपला. अशा परिस्थितीत अनेकजण पान 3 वर

